## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाच्यावतीने दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सेनादलाचा सक्रिय सहभाग असणार आहे.

भारतीय सेनादलाचे लष्कर प्रमुख श्री. मनोजकुमार पांडे यांचे प्रतिनिधी म्हणून विशेष आमंत्रित म्हणून ब्रिगेडयर राहुल दत्त (उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात क्षेत्र प्रमुख) हे उद्घाटन सत्रातील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये देशभरातील अनेक प्रतिष्ठीत विद्यापीठातून शोध निबंध सादर केले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने मद्रास विद्यापीठ, जम्मु विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यातील संशोधकांचा समावेश आहे. १५० शोधनिबंधांची नोंदणी झालेली असून २७५ प्रतिनिधींची औपचारिक नोंदणी झालेली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय्यत तयारी सुरू असून सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ विचारवंत डॉ. विनय सहस्त्रबुध्दे हे करणार असुन देशभरातील मान्यवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने मेजर जनरल डॉ. जी. डी. बक्षी (निवृत्त) सेनापदक, विशिष्ठ सेवापदक, दिल्ली, डॉ. श्रीकांत परांजपे (माजी संचालक यशवंतराव चव्हाण आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण विश्लेषक राष्ट्रीय केंद्र सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे), श्री. जयंत उमराणीकर (माजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र), श्री विक्रमसिंह बाजी मोहिते (भारत इतिहास संशाधक मंडळाचे सदस्य, पुणे), श्री. प्रकाश पाठक (माजी सरकार्यवाह, सेंट्रल हिंदु मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक), श्री. रघुजीराजे आंग्रे (अध्यक्ष श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे), श्री. सुधीर थोरात (महाराष्ट्र शासनाच्या किल्ले रायगड प्राधिकरणाचे सल्लागार, पुणे),डॉ. सचिन जोशी (पुरातत्व विभाग डेक्कन कॉलेज, पुणे), डॉ. श्री. वरूण भामरे (रायगड विकास प्राधिकरण, रायगड), डॉ. अशोक राणा (अमरावती), डॉ. कमाजी डख (छत्रपती संभाजीनगर), यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

या चर्चासत्रात १) राष्ट्र उभारणीत छत्रपती शिवाजी महाराजांचा राष्ट्रीय दृष्टीकोन २) छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळयाचे महत्व ३) छत्रपती शिवाजी महाराजांची गनिमीकावा, नीती आणि तिचे सध्यकालीन महत्व ४) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोहिमेतील गुप्तहेर यंत्रणेचे महत्व ५) शिवकालीन किल्ल्यांचे भू-सामरिक महत्व ६) मराठा साम्राज्यातील लष्करी व्यवस्था आणि शस्त्र प्रकार ७) मराठा आरमार बांधणीचा दूरगामी उद्देश आणि महत्व ८) मराठ्यांचे युध्दतंत्र आणि रणनीती ९) छत्रपती शिवाजी महाराजांची लोकाभिमुख प्रशासन व्यवस्था १०) महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची भूमिका आणि कार्यपध्दती ११) राज्यव्यवहारकोष : मराठी भाषा संवर्धन १२) भारताचा स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्त्रोत या उपविषयांवर चर्चा व शोधनिबंध सादर होतील. या सर्व शोधनिबंधाचे प्रकाशन केले जाणार असून संशोधकांसाठी ही एक खुप मोठी संधी असणार आहे असे या चर्चासत्राचे समन्वयक डॉ. तुषार रायसिंग यांनी कळविले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीने आयोजित केलेल्या "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेज २०२३" अंतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धेत २३ कल्पनांची निवड झाल्याबद्दल कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि के. सी. आय. आय. एल तर्फे सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## जनसंपर्क विभाग

या स्पर्धेतंर्गत संपूर्ण महाराष्ट्रातुन ३६ जिल्ह्यास्तरावर २८५ कल्पनांची निवड करण्यात आली. या प्रत्येक कल्पनेस महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीकडून १ लाखाचे बीज भांडवल पुरविण्यात येणार आहे. या २८५ कल्पनांतर्गत खान्देशातील २३ कल्पनांची निवड झाली. निवड झालेल्या सर्व कल्पना विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालय व विभागातील विद्यार्थ्यांच्या आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल विद्यापीठ आणि के. सी. आय. आय. एल (इन्क्युबेशन केंद्र) तर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात के. सी. आय. आय. एल. तर्फे कल्पना स्टार्टअप महाराष्ट्र स्तरावर नेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून "बीज भांडवलाच्या निधीच्या वापरासाठी मानक कार्यप्रणाली" या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. समीर पाटील यांनी केले. कार्यक्रमाची रुपरेषा संचालक डॉ. राजेश जवळेकर यांनी मांडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे होते. प्रास्ताविक श्री. सागर पाटील यांनी केले. सदर कल्पना या इंजिनिरींग १०, इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी ३, कृषी ४, आरोग्य ५ आणि ऊर्जा या क्षेत्रांशी संबधित होत्या.

कार्यशाळेत व्यवस्थापक डॉ. समीर पाटील व सागर पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेची सांगता संचालक डॉ. विकास गीते यांच्या उपस्थितीत झाली. या कार्यशाळेत प्रा. संदीप पाटील (के. सी. ई. जळगाव), डॉ. सुनील न्याती (के. सी. ई. (सी. ओ. ई. एम, जळगाव), डॉ. एजाज अहमद (फार्मसी महाविद्यालय, अक्कलकुवा) हे उपस्थित होते. श्री. दर्पण साळुंखे यांनी आभार मानले. केसीआयआयएल तर्फे श्री. देवेंद्र काळे व श्री. योगेश पाटील तसेच विशाल पाटील यांनी यशस्वीतेसाठी काम पाहिले.

……………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी